भारतात अनेक परदेशी उत्पादनांना चांगली मागणी- डॉ. पी. एस. कांबळे

विविध देशांत भारतीय उत्पादनांना तर भारतात अनेक परदेशी उत्पादनांना चांगली मागणी आहे. नफा मिळवून देणाऱ्या या व्यवसायातील विविध संधींविषयी असणाऱ्या अपुऱ्या माहितीमुळे याचा फायदा अजूनही अनेक व्यापारी व नव्याने व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्या नवउद्योजकांना मिळत नाही असे विधान श्री व्यंकटेश महाविद्यालयात अर्थशात्र विभागांतर्गत 'आयात-निर्यात व्यापार प्रक्रिया' संबंधी कोर्सचे उदघाटन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे अर्थशास्त्राचे वरिष्ठ अध्यापक डॉ. पी. एस. कांबळे  यांनी केले. पुढे ते म्हणाले की देशात आयात निर्यात प्रक्रिया कशी होते, प्रशिक्षणात आयात-निर्यात अटी व प्रक्रिया, प्रमुख संकल्पना, विपणन योजना, निर्यात सुरू करण्यापूर्वीची तयारी, कागदपत्रे, वाटाघाटीचे कौशल्य, व्यवस्थापन, डिजिटल साधने, भौगोलिक-राजकीय बदल, कंटेनर व्यवस्थापन आणि मालवाहतुकीचे दर इ. महत्त्वाच्या गोष्टींचा फायदा कसा घ्यावा, याबाबत  माहिती असणे आवशक्य आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना आयात निर्यातीची भारतीय अर्थव्यवस्थेतील भूमिका या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डी. बी. पवार यांनी केले. प्रमुख अतिथींची ओळख डॉ. एस. आर. ठाकर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. ज्योति पवार ने केले.

